# कागदाची करामत

माला कुमार । रुची शाह



वाचन पातळी २

Pathfinder
C12049


# कागदाची करामत



लेखन: माला कुमार

चित्रं: रुची शाह

मराठी अनुवाद: नेहा जोशी



'झुऽईऽ' खिडकीतून जोरात वारा आला.
वाऱ्याबरोबर एक पांढरा कागद आत आला.



मंजूनं तो कागद उचलला
आणि त्याच्यावर सूर्य काढायला
लागली. ते चित्रं काहीसं असं होतं.
''शीऽऽ..... हा काही सूर्य वाटत नाहीये'' मंजू म्हणाली.
तिनं कागद चुरगाळून, त्याचा बोळा करून खिडकीच्या बाहेर फेकून दिला.

तो कागदाचा बोळा वसीमच्या डोक्यावर पडला. ''वा! किती छान चेंडू'' तो आनंदानं म्हणाला आणि त्या कागदाच्या बोळ्याशी खेळायला लागला.

त्यानं तो बोळा वर हवेत फेकला आणि तो खाली कसा येतोय हे बघत राहिला. मग तो कागदाचा बोळा त्यानं आणखी उंच फेकल्यावर तो आणखी वेगानं खाली आला. तेवढ्यात वसीमला त्याची बहीण सईदा त्याच्याकडे येताना दिसली.

9558

त्यानं नेम धरून कागदाचा बोळा तिला मारला आणि 'कसं पकडलं' असं आनंदानं जोरात ओरडला.



सईदानं तो कागदाचा बोळा उचलला आणि त्याच्यात एक पेन्सिल खोचून ती वसिमला म्हणाली, ''भय्या, तुला हा लॉलिपॉप पाहिजे?




मी मोठी झाले ना, की मी माझ्या खाऊच्या दुकानात असे खूप वेगवेगळ्या प्रकारचे लॉलिपॉप ठेवणार आहे.''

तेवढ्यात बिट्टू तिथे आला.
''मला देशील हा लॉलिपॉप?'' त्यानं विचारलं.

9558

त्यानं लॉलिपॉप खोटा-खोटा खाऊन टाकला.
आणि मग कागदाचा बोळा उघडून त्याची सुरनळी केली.




मग तो खोटा माईक हातात धरून म्हणाला, ''हॅलो हॅलो, हॅलो माईक टेस्टिंग, एक, दोन, तीन. आता मी एक छान गाणं म्हणून दाखवतो तुम्हाला.''


बिट्टूनं मोठ्या आवाजात, हिंदी सिनेमातलं एक छान गाणं म्हटलं. मंजूनं त्याच्या हातातून ती कागदाची सुरनळी घेतली आणि तो कागद नीट उलगडून त्याची होडी तयार केली.




यावर बिट्टू म्हणाला, ''आता जगप्रसिद्ध गायक बिट्टू या जहाजातून भारतभर आणि जगभर फिरतील.''
''ए, मी पण येऊ तुझ्याबरोबर?''
वसीम म्हणाला.



वसीमनं होडी उचलली आणि
ती उलगडून कागद सरळ केला.



मग त्यानं कागदाची रुमालासारखी घडी केली.
कोपऱ्याचा कागद फाडून, कागदाच्या मध्ये एक गोल
तयार केला. वसीमनं तो कागद उघडला.



कागद वर धरून, मधल्या कापलेल्या गोलातून बघत तो म्हणाला, ''आता सगळ्यांनी इकडे बघा आणि हसा.''

सईदा, बिट्टू आणि मंजू हसले.



आणि नंतर तर खिदळायला लागले. वसीमनं कागद चुरगाळून त्या कागदाच्या कॅमेऱ्याचा पुन्हा बोळा केला.

तेवढ्यात अनिल आपल्या गाढवाबरोबर तिथे आला. मंजूची पेन्सिल घेऊन त्यानं कागदाच्या मध्ये फाडलेल्या गोलाभोवती सरळ रेषा काढल्या.



''वा! किती सुंदर दिसतोय हा सूर्य!'' मंजू म्हणाली.

अनिलच्या गाढवानं मंजूच्या हातातून तो कागदाचा सूर्य घेतला आणि गपकन् गिळून टाकला. 'डऽरर' असा त्यानं जोरात ढेकर दिला.

तो कागद गिळल्यावर, गाढवाचा चेहरा एकदम वेगळाच दिसायला लागला.

आता त्याचा चेहरा असा का झाला? कागद न चावता पटकन गिळल्यामुळे, की अख्खा सूर्य गटकन् गिळल्यामुळे?





मंजूला एक कागदाचा तुकडा सापडतो. हा कागद एकाकडून दुसऱ्याकडे जाताना फक्त  कागद रहात नाही.
त्याचं खूप काय काय बनतं.
कागदाचे तुकडे वापरून, कोलाज पद्धतीनं या पुस्तकाचं चित्रांकन केलं आहे. ही करामत आहे कागदाची आणि कल्पनांचीही.

टप्प्याटप्प्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी २ आहे.

**प्रारंभिक वाचन / मुलांना वाचून दाखवण्यासाठी**
वाचायला नुकतीच सुरुवात करणाऱ्या आणि गोष्ट ऐकायला आवडणाऱ्या छोटुकल्यांसाठी.
१

**वाचायला शिकणे**
ओळखीचे शब्द वाचू शकणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचणाऱ्या मुलांसाठी.
२

३
**स्वतंत्रपणे वाचन**
आपले आपण वाचणाऱ्या मुलांसाठी.

४
**सराईतपणे वाचन**
आत्मविश्वासानं वाचणाऱ्या मोठ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS
प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते.
www.prathambooks.org

Paper Play
(Marathi)
MRP: ₹ 25.00

ISBN 978-81-8479-228-7
9 788184 792287